ग्रामपंचायत : ढवळपुरी

कामाचे नाव : बिरोबा मंदिर ते खंडोबा मंदिर रस्ता दुतर्फा वृक्षलागवड.

ग्रामपंचायत : ढवळपुरी.

तालुका / जिल्हा : पारनेर / अहमदनगर

कामावर झालेला एकूण खर्च : 7,57,796/-

लाभाबाबत संक्षिप्त माहिती : बिरोबा मंदिर ते खंडोबा मंदिर रस्ता दुतर्फा वृक्षलागवड हे काम 2021-22 या आर्थिक वर्षात मंजूर आहे. सदर कामांची मंजूर रक्कम ही 12,67,280/- इतकी आहे. सदर कामावर 5 मजुर आहेत. त्यापैकी 1 विधवा महिला व 1 परित्यक्ता महिला मजूर म्हणून काम करत आहेत.

लाभ देण्यापूर्वीची स्थिती : बिरोबा मंदिर ते खंडोबा मंदिर या ठिकाणी पूर्ण ओसाड जमीन होती.झाडे नसल्यामुळे पक्ष्यांना राहण्यासाठी निवारा नव्हता. रस्त्याचे कडेने कुठल्याही प्रकारची झाडे नसल्यामुळे वाटसरूना विसावा घेण्यासाठी सावली नव्हती.

लाभ दिल्यानंतर झालेला बदल : रस्ता दुतर्फा वृक्षलागवड काम मंजूर केले नंतर त्या ठिकाणी वातावरणामध्ये गारवा निर्माण झाला. कामावर मजुराना रोजगार उपलब्ध झाला. त्या ठिकाणी पक्ष्यांचा किलकिलाट सुरू झाला. जमिनीची धूप थांबली. रस्त्याच्या कडेने सावली निर्माण झाली.

पवन शरद भालेराव
तांत्रिक सहाय्यक पंचायत समिती पारनेर.
जिल्हा अहमदनगर

बिरोबा मंदिर ते खंडोबा मंदिर रस्ता दुतर्फा वृक्षलागवड





## यशोगाथा
## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत
## समृद्ध कुटुंब / लखपती कुटुंब

**लाभार्थी नाव -** राजेश सुखदेव वाव्हळ

**गाव –** मुंजेवाडी

**तालुका –** जामखेड

**जिल्हा –** अहमदनगर.

**पार्श्वभूमी :-**

तीन जिल्ह्याच्या सीमेवर असलेलं जामखेड तालुक्यातील मुंजेवाडी हे छोटसं खेडेगाव गावातील 97 टक्के लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. शेती व्यवसाय हाच मुख्य व्यवसाय शेतीमध्ये ज्वारी, बाजरी, उडीद व हरभरा ही पारंपारिक पिके पारंपारिक पद्धतीने पावसाच्या पाण्यावर घेतली जातात. येथील कष्टकरी कुटुंबातील सुशिक्षित बेरोजगार तरुण राजेश सुखदेव वाव्हळ मुंजेवाडी गावात वडिलोपार्जित असणारी 1.33 आर जमीन तेही गेली वीस ते पंचवीस वर्षे गावातील दुसऱ्या व्यक्तीला कसण्यासाठी दिलेली असल्याकारणाने शेतीतून म्हणावे असे उत्पन्न मिळत नव्हते. स्वतःची शेती असूनही दुसरीकडे कष्ट करणे परवडत नसल्याकारणाने स्वतःची शेती आधुनिक पद्धतीने करण्याचा विचार डोक्यात आला परंतु काय करावे, कसे करावे काहीही समजत नव्हते.

**कामाची सुरुवात :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची माहिती Youtube वर शेती संबंधी माहिती घेतली. त्या काळात ज्या शेतकऱ्यांचे शेतीपासून उत्पन्न चांगले मिळाले अश या शेतकऱ्यांचा शोध घेऊ लागलो. त्यादरम्यान पंचायत समिती जामखेड येथील समीर शेख, गणेश देशमुख यांच्या संपर्कात येऊन माहिजळगाव येथील प्रगतशील शेतकरी श्री.किरण शेवाळे यांच या पेरूच्या बागेची पाहणी केली व चर्चा केली असता आपणही पेरूची व लिंबूची फळबाग लागवड करण्याची कल्पना सुचली. परंतु माझी शेत जमीन कोरडवाहू असल्याने पाण्याची कशी सोय करावी ही समस्या भेडसावत असताना पंचायत समितीच्या रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून शेतात वैयक्तिक सिंचन विहीर अनुदानातून मिळत असल्याची माहिती मिळाल्याने मी ग्रामपंचायत मुंजेवाडीच्या ग्रामसेवक, सरपंच व रोजगार सेवक यांच्या माध्यमातून वैयक्तिक सिंचन विहिरीसाठी प्रस्ताव दिला. प्रस्ताव प्राप्त होऊन सन 2019-20 मध्ये मला शासनाच्या अनुदानातून वैयक्तिक सिंचन विहीर मिळाली. खोदकाम दरम्यान विहिरीला पाणीही लागले व डोक्यात जी फळबागेची कल्पना होती पण प्रत्यक्षात शेती करण्यासाठी माझ्याकडे पुरेसे भांडवल नसल्याकारणाने माझ्या डोक्यातील फळबागेची कल्पना प्रत्यक्षात येते की नाही असे वाटत असतानाच पंचायत समिती जामखेड मध ये ग्राम पंचायत मार्फत फळबाग लागवड व ठिबक सिंचनासाठी प्रस ताव सादर केला. मा.कोकणी साहेब तत कालीन गटविकास अधिकारी, मा. शेळके साहेब कृषी अधिकारी, मा. भजनावळे साहेब विस तार अधिकारी, मा. गणेश देशमुख तांत्रिक अधिकारी यांच्या सहकार्याने मला पेरू व लिंबूनी बागेच्या प्रस्तावास मंजुरी मिळाली. त्याच बरोबर फळबागेसाठी लागणारे ठिबक सिंचन महाराष्ट्र शासन कृषी विभाग जामखेड यांचे कडून मिळाले. स्वतःकडील काही थोडेसे भांडवल व पंचायत समितीच्या रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून फळबागेला सुरुवात केली. स्वतःच्या शेतात काम करत असताना मला व माझ्या कुटुंबाला व इतरही गावातील गरीब मजुरांना रोजगार मिळाला.

पेरू व लिंबूनी फळबागेत काम करत असताना खरीप व रब्बी हंगामात मी आंतरपीक म्हणून उडीद, हरभरा, गहू व कांदा पिकांचे ही उत्पादन घेतले आहे. गहू आंतर पिकाच्या माध्यमातून खर्च वजा जाता 24750/- रुपये, हरभरा उत्पन्नातून 28500/- व उडिद कांदा उत्पादनातून 17000/- रुपये मिळाले. त्याचबरोबर मुख्य पेरू उत्पादनातून मला पहिल्याच वर्षी खर्च वजा जाता 57500/- रुपये निव्वळ उत्पन्न मिळाले. एकत्रित वार्षीक उत्पन्न पाहता मला 127750/- मिळाले असून लिंबोणी फळबागेचे उत्पन्न आणखी दोन वर्षांनी चालू होणार आहे. त्याच बरोबर मी शेतीच्या बांधावर 50 नारळाची, 20 केशर आंब्याची व लिंबोणीच्या झाडाच्या मध्ये 100 रक्तचंदनाच्या झाडांची लागवड केली आहे. त्या माध्यमातून मला येणाऱ्या काळात चांगले उत्पन्न अपेक्षित आहे.

तसेच मी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून गाई पालन शेड घेतले असून येत्या काळात दुग्ध व्यवसाय करण्याचेही उद्दिष्ट डोळयासमोर ठेवले आहे.

**परिणाम :-**

शेती पारंपारिक पद्धतीला फाटा देऊन आधुनिक पद्धतीने जर शेती केली तर निश्चितच शेतीतून चांगल्या प्रकारचे उत्पन्न मिळते. त्यामधुन स्वताचा,कुटुंबाचा आर्थिक विकास उंचावला. मुलांचे शिक्षण,आरोग्य व इतर सुखसुविधा कुटूंबाला मिळाल्या व समाजाचा आपल्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलला. त्या साठी स्वतः शेतीत कष्ट करण्याची तयारी असली पाहिजे. खरंतर मी प्रगतशील शेतीकडे फक्त रोजगार हमी योजनेच्या योजनांमुळे वाटचाल करत आहे. त्यासाठी माझी ग्रामपंचायत मुंजेवाडी येथील ग्रामसेवक तांबोळी भाऊसाहेब, सरपंच ठकाण तसेच मा. प्रकाशजी पोळ साहेब गट विकास अधिकारी पंचायत समिती जामखेड, मा.शेळके साहेब कृषी अधिकारी, मा.समीर शेख सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, मा.गणेश देशमुख तांत्रिक सहाय्यक, मा.संभाजी ढोले तांत्रिक सहाय्यक व त्यांचे सर्व सहकारी यांचे खूप मोलाचे सहकार्य लाभले. त्यामुळेच मी प्रगतशील शेतीच्या दिशेने वाटचाल करू पाहत आहे.

खरंच जर एखाद्या अल्पभूधारक शेतकऱ्याने ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या पाच ते सहा कामांचे पॅकेज घेतले व शेतीला जर आधुनिक पद्धतीची जोड दिली तर महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात मोठी वाढ होऊन मा. नंदकिशोर साहेब अप्पर मुख्य सचिव मग्रारोहयो व त्यांच्या टीमच्या कल्पनेतील महाराष्ट्रातील शेतकरी निश्चितच लखपती झाल्याशिवाय राहणार नाही. असे मला वाटते.




मा.श्री.प्रकाश पोळ सर,ग.वि.अधिकारी
( पं.स.जामखेड)


श्री.अशोक शेळके सर, ( कृषी
अधिकारी-जामखेड)




Latitude: 18.523163
Longitude: 75.317645
Elevation: 581.77 m
Accuracy: 3.8 m
Time: 15-07-2021 16:11
Note: राजेश सुखदेव वाव्हळ मुंजेवाडी
Powered by NoteCam


निंबु फळबाग,आंतरपीक-गहू









**धन्यवाद**